
न हि ज्ञानेन
सदृशं पवित्रमिह
विद्यते।
ज्ञानज्योती
हस्तलिखितांक २०१७


ज्ञान ज्योती
कु. कुणाल प्रकाश केळुसकर. दहावी. अ
मुख पृष्ठ स्पर्धा. २०१७ - विजेता

न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।

मालवण एज्युकेशन सोसायटी, मालवण संचालित

रावबहादुर अनंत शिवाजी देसाई टोपीवाला हायस्कूल
ना. अ. दे. टोपीवाला ज्युनिअर कॉलेज, मोहनराव परुळेकर प्राथमिक शाळा
जयगणेश इंग्लिश मिडियम स्कूल, मालवण

# ज्ञानज्योती २०१७



संकल्पना

श्री. दिगंबर सामंत.
अध्यक्ष, स्कूल कमिटी

प्रकाशक

श्री. विजय कामत.
सचिव, मालवण एज्यु. सोसायटी, मालवण

संपादक

प्राचार्य, प्रदीप महादेव साटम.
प्राचार्य, टोपीवाला प्रशाला

कार्यकारी संपादक

श्री. महेश आत्माराम धामापूरकर.
सहाय्यक शिक्षक, टोपीवाला प्रशाला

स्वामित्व

श्री. आनंदकुमार चव्हाण.
अध्यक्ष, मालवण एज्युकेशन सोसायटी, मालवण.

# ज्ञानज्योती २०१७

**सहसंपादक**
श्री देविदास उत्तम वेरलकर.

**संपादक**
प्रा. श्री. प्रदीप महादेव सातम (प्राचार्य, टोपीवाला प्रशाला)

**कार्यकारी संपादक**
श्री महेश आ. धामापूरकर

## संपादक मंडळ
श्री. लक्ष्मण वसंत वळंजू
श्री. चंद्रशेखर गणपत बर्वे.
डॉ. श्री. सतीश परशुराम तेरसे
सौ. अस्मिता संजय रावराणे
सौ. मानसी महेश धामापूरकर
सौ. ज्योती रविकिरण तोरसकर
सौ. मधुरी मदन भिसे.

## सुलेखन
समृद्धी भालचंद्र डिचवलकर
एकता दत्तप्रसाद चालोलकर
मानस आराधणा मुणगेकर
सिद्धी लक्ष्मण परूळेकर
दीपशिखा रवींद्र रेवंडकर
दीना वामन हिर्लोस्कर
अमृता बाबुराव गोवारकर
विजिता प्रशांत पांजरी
हर्षाली विलास आडकर
गौरी गोपाल आडकर
पूजा महेश सावंत
श्रद्धा दत्तात्रय परब
प्रकाश चंद्रकांत आजगांवकर
अपूर्वा मंगेश शिंदे.

## मुखपृष्ठ, मांडणी आणि सजावट
सौ. राखी देवदत्त अरदकर
श्री. बलराम गोविंद सामंत
श्री. महेश आत्माराम धामापूरकर

## रेखाचित्रे
श्री. बलराम गोविंद सामंत
मंदार मिलिंद शिरोडकर
विजिता प्रशांत पांजरी
प्रकाश चंद्रकांत आजगांवकर
श्रेया सदानंद मांगावकर
वैशाली सुरेश खवणेकर

## साहाय्य
श्रुती विठ्ठल सापळे
अपूर्वा शिवराम बांदेकर
गौरी उमेश मेस्त्री
कीर्ती प्रह्लाद विरकर
ईशा राजेंद्र धुरी
जुही धनंजय मणचेकर
मधुरी मिलिंद मुणगेकर

## शीर्षक लेखन
श्री. श्यामसुंदर भास्कर वारंग.
मंदार मिलिंद शिरोडकर.





# हृद्गत...

अ. शि. दे. टोपीवाला हायस्कूल, टोपीवाला ज्युनि. कॉलेज, मोहनराव परुळेकर प्राथमिक शाळा आणि जय गणेश इंग्लिश मिडियम स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने सन २०१६-१७ या वर्षीचा 'ज्ञानज्योती' हस्तलिखितांक साकार होतो आहे. पारंपरिक वाटेने न जाता, विद्यार्थी आणि शिक्षक यांचा सुंदर समन्वय कसा साधता येईल, असा विचार संस्थेचे कार्याध्यक्ष मा. दिगंबरजी सामंत यांच्या मनात आला.. आणि त्यातूनच या हस्तलिखितांकाचा जन्म झाला. 'ज्ञानज्योती' हा नितांत सुंदर हस्तलिखितांक एकाएकी निर्माण झाला नाही. त्यासाठी प्रशालेतील सर्व शिक्षकांनी आणि विद्यार्थ्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या वैचारिक मंथनातून या हस्तलिखितांकाला मूर्त स्वरूप प्राप्त झाले. या अंकात विद्यार्थ्यांच्या निवडक लेख, कविता, चुटक्यांचा समावेश केलेला आहे. याद्वारे भविष्यातील साहित्यिकांचा शोध घेण्याचा, वाचन-लेखन संस्कृती जोपासण्याचा आणि विद्यार्थ्यांच्या सुप्तगुणांना वाव देण्याचा प्रयत्न केलेला आहे. या अंकातील लेख-कवितांना आशयानुरूप चित्रे काढण्याचे काम मुलांनीच केले आहे. विधात्याने सर्वांनाच कल्पनाशक्ती दिलेली आहे; परंतु त्याची जाणिव सर्वांनाच असते, असे नाही. कस्तुरीमृगासारखा विद्यार्थीसुद्धा सैरवैरा भटकत असतो. माझ्या शिक्षकांनी विद्यार्थ्यांना त्यांच्यातील सुप्त-गुणांची जाणिव करून दिली... आणि हीच सर्जनशीलता पानापानावर विराजमान झाली...

या हस्तलिखितांकासाठी परिश्रम घेणाऱ्या ज्ञात-अज्ञातांचा इथे ऋणनिर्देश करतो. 'संपादक' या नात्याने संत ज्ञानेश्वरांच्या शब्दांत सांगावेसे वाटते... 'ऊन ते सरावे। अधिक ते पुरवावे।'...

मित्र हो!... या ज्ञानज्योती हस्तलिखितांकावर खचितच तुमचे सर्वांचे भरभरून प्रेम राहील, अशी आशा व्यक्त करून थांबतो.

प्रा. प्रदीप महादेव सावंत.
संपादक.

अनुक्रम


मालवणातील दिवाळी पाडवा - ०१


बंडोपंत फूल तोडे - १६


हमारा वार्षिक क्रीडामहोत्सव - ६८


Are we prepared to face Tomorrow - ५८

## मराठी विभाग


०१ मालवणातील दिवाळी पाडवा
कु. सिया प्र. अंधारी १
०२ खेळ रंगला - कु. कृपा शं. पाटकर ३
०३ दिवाळी - कु. योगिनी जाधव ४
०४ झाली नोटबंदी - दर्शी सामंत ४
०५ माणसा, माणसा, कधी होशील
रे माणूस ? नम्रता चव्हाण ६
०६ जाणीव - चराश्री उरक ८
०७ उमंग जगातील - अदिती कुडतरकर ११
०८ आम्ही मालवणी - कौस्तुभ नाईक १२
०९ आयुष्य - तेजस भगत १२
१० सौंदर्य - देवश्री मुरवणे १३
११ एक मैत्रीण अशीही असावी १४
समीक्षा मलदवलकर
१२ बंडोपंत फूल तोडे १६
एकता खानोलकर
१३ आजी, आजोबा घरी या ! १७
चांदना चिवलकर

१४ एक होता ससा -
सानिया आजगावकर १७
१५ अजब दुनिया - मयुरी ठाकूर १८
१६ एका भारतीयाचे स्वप्न -
शुभदा शेटवे २०
१७ दुर्लक्षितशी सिंधुदुर्गाची
स्वत तोरसकर २१
१८ सैनिक - प्रणय बांदेकर २४
१९ जीवन - समृद्धी चिवलकर २४
२० माझे बाबा - मयुरी कुडेर २५
२१ बाबा - गायत्री मसेकर २६
२२ लोकगीत - गीता गावडे २६
२३ गुलझार - आदित्य वर्दम २७
२४ पावसात - मंदार केळकर २८
२५ ळळा फळाचा - केदार तांडेल २८
२६ चौसष्ट कलांमधील एक कला -
मधुबन कला - विनिता पांजरी ३०
२७ वळी रजाचे दुःख -
आशिष वाकुडे ३२

२८ वेळेचे गणित - रोहित कोकरे ३३
२९ पत्रलेखन - एक प्रयत्न -
भूमिका सोंडलकर ३६
३० मैत्री - श्रुती जाधव ३७
३१ पटलं तर घ्या - रिया जाधव ३७
३२ पर्यावरण आणि मानवी जीवन - ३८
आरती कांदळकर
३३ अनंतासी शाळा -
सानिका नाबेशगकर ४०
३४ आव्हाना - संदेश गावडील ४०


## इंग्रजी विभाग


01 Brave Soldiers -
Purva Parab ४२
02 Books are Our Lives -
Pranjal Patil ४२
03 Nature - Diva Golatkar ४३
04 Examination -
Divya Todankar ४३
05 Acrostic -
Samiksha Aswalkar ४४
06 Why does the Sun Shine?
Rugved Khadapkar ४५
07 True Gift - The Knowledge ४८
Utkarsha Kolgaonkar
08 More the hardwork, More the Success -
Diksha Govekar ४९
09 Green House Effect and Global Warming -
Chinmay Barve ५३
10 The Secret of Life -
Ashish Zantye ५६
11 The Unique Artist -
Vinita Panjari ५८
12 Are We Prepared to face Tomorrow -
Siddhi Parulekar ५९

# अनुक्रम



झाली नोटबंदी - ०४



बळीराजाचे दुःख - ३२



तितली रानी - ८२



Nature - ४३


## इंग्रजी विभाग

०१ Think as brief - montina Janya ६१

## संस्कृत विभाग

०१ सविता चन्द्रः च । - श्रुती प्रभाळे ६२

०२ रसप्रज्ञा: । - ऋतिका तोंडवळकर ६३

## हिंदी विभाग

०१ आतंकवाद के बढ़ते कदम और भारत का प्रत्युत्तर - श्रावणी कुबल ६५

०२ निष्पाप बच्चे - संस्कृती मिराशी ६७

०३ हमारा वार्षिक क्रीडामहोत्सव - विमल परब ६८

०४ महेंद्रसिंग धोनी - केतन वाघ ७१

०५ बाढ़ : नदी का रौद्ररूप - पूजा कदम ७२

०६ भारतीय किसान - अदिती रेवंडकर ७३

०७ खजाना - अपर्णा कुडाळकर ७६

०८ जिंदगी का महत्त्व - मयुरी ठाकूर ७५

०९ राष्ट्रोन्नती में युवकोंका योगदान - गौरी आडकर ७८

१० जागो तो एक बार वीरो - कौस्तुभ नाईक ७९

११ दान करो - सानिका वाडेगावकर ७९

१२ जीवन एक सागर - चैताली चौकेकर ८०

१३ तितली रानी - सोऽहम् बनसोडे ८२

१४ बचपन - तन्वी चव्हाण ८२

१५ हमारा कॉलेज - नूरबानु खान ८३

१६ खुद की पहचान - किशोरी जाधव ८३

१७ फकीर से चित्रकार - विनिता पांजरी ८४

१८ आपकी अपनी बेटी - मॉन्टीना डान्या ८५

१९ बारिश - श्रुती कांबळी ८५

०१ कुणाल प्रकाश केळुसकर मुखपृष्ठ स्पर्धा २००७ विजेता

०२ ओंकार मिलिंद शिरोडकर

०३ विठ्ठल रामदास दिघोळकर

०४ गणेश राजेंद्र परब

०५ विनिता प्रशांत पांजरी

०६ गौरी उमेश मेस्त्री

०७ भावेश शरद केरकर

०८ मिहिर मंगेश डाभोळकर

०९ प्रथमेश दत्ताराम चव्हाण

१० गौरांगी किशोर जोशी

११ श्रद्धा महेश पराडकर

१२ शिवानी अशोक सडवेलकर

१३ श्रुती विठ्ठल सावळे

१४ अंकिता नितीन लुडबे

१५ प्रेषा रमाकांत अडक

१६ सिद्धी संदीप इडकर

# मालवणातील दिवाळी पाडवा

कोपरान् कोपरा उजळणारी
याही दिवाळी घरोघरी

साधारणपणे दिवाळी अश्विन - कार्तिक महिन्यात येते. दिवाळी येण्याच्या आधी सात - आठ दिवस सगळे लोक स्वतः च्या घराची, दुकानाची साफसफाई करु लागतात. आणि घरे सुशोभित करतात. लहान मुले नवनवीन कपडे खरेदी करतात. दिवाळीच्या पहिल्या दिवसाला 'धनत्रयोदशी' म्हणतात. या दिवशी धान्याची पूजा केली जाते. संध्याकाळी दिवे लावण्याच्या वेळी सुहासिनी घराच्या दारासमोर रांगोळी काढतात आणि पणत्या लावतात. तेव्हा घरातलं वातावरण प्रसन्नदायी असते.

मालवणात चौथ्या दिवशी दिवाळी पाडवा साजरा केला जातो. पूर्ण मालवण शहरात विद्युत दिव्यांच्या माळा लावल्या जातात. दुकानदार दुकानांच्या पायऱ्यांवर पणत्या लावतात आणि जागोजागी आपल्याला सुंदर रांगोळ्या पहायला मिळतात. ठिकठिकाणी सत्यनारायणाच्या महापूजा आयोजल्या जातात. बरेच जण सिंधुदुर्ग किल्ल्याचे देखावे करतात. ते देखावे पाहण्याजोगे असतात. त्यात शिवाजी महाराजांचा इतिहास दाखविला जातो.

मालवणात महत्त्वाचं म्हणजे या दिवाळी पाडव्यादिवशी श्री देव रामेश्वर पालखी सोहळा मोठ्या थाटामाटात साजरा केला जातो. दुपारी एकच्या दरम्यान श्री देव नारायणाला श्री देव रामेश्वर भेटतो. श्री देव नारायणाची भेट झाल्यानंतर श्री देवी सातेरीला भेटण्यासाठी रामेश्वर मोठ्या थाटात जातो. सातेरी देवीला भेटल्यानंतर तिथूनच नांदरुख ग्रामी वसलेला सर्वांचा प्रमुख देव श्री गिरोबाला गाऱ्हाणे दिले जाते आणि आवाहन केले जाते. त्यानंतरच खऱ्या अर्थाने पालखीचे प्रस्थान प्रदक्षिणा मार्गावर होते. आता पालखीत 'श्री रामेश्वर', 'श्री नारायण', 'श्री सातेरी', 'श्री गिरोबा इ. देव उपस्थित झाल्यानंतर पालखी 'जड' झाली असे म्हणतात. या पालखीबरोबर अनेक भक्तजन पालखीचा सोहळा पूर्ण होईपर्यंत असतात. फटाके सुद्धा लावले जातात. नंतर ढोल - ताशाच्या गजरात ही पालखी बाजारीच्या भूतनाथ मंदिरात येऊन थांबते.

बाजारीतील रहिवासी भूतनाथ मंदिरात पालखीच्या दर्शनासाठी जमा होतात. प्रत्येक जण पालखीत नारळ व पैसे ठेवतात. प्रत्येकाचं गाऱ्हाणं केलं जातं. भूतनाथ मंदिराच्या मानकरी पालखीबरोबर आलेल्या प्रत्येक मानकऱ्याला मानाचा म्हणून एक - एक नारळ ठेवतात. अशाप्रकारे हा पालखीचा सोहळा भूतनाथ मंदिरात जवळजवळ तासभर चालतो.

भूतनाथ मंदिरातून निघून श्री रामेश्वर देवाची पालखी समुद्रकिनाऱ्यामार्गे वाजत गाजत शिवकालीन 'मोऱ्याचा धोंडा' येथे जाते. त्या ठिकाणी तेथील भाविक पालखीचं दर्शन घेण्यासाठी आधीच येऊन रांगेत उभे राहतात. नंतर पालखी आल्यावर दर्शन घेतात. दर्शन झाल्यावर पालखी किनाऱ्यावरूनच मालवणातील दांडेश्वर मंदिरात येण्यासाठी निघते. तिथेही तेथील भाविक मोठ्या संख्येने पालखीचं दर्शन घेतात.

दांडेश्वर मंदिरातील भेटीचा कार्यक्रम होताच पालखी समुद्रावरुन मुस्लीम वस्तीकडून आई काळबादेवीला भेट देते. मात्र या मुस्लीम वस्तीचा मानाचा नारळ 'श्री' स्वीकारतात. या दरम्यान मुस्लीम दर्ग्याकडे पालखीसमोरील ढोल ताशे पूर्णतः बंद

असतात. कालबादेवी मंदिरातसुद्धा भक्तांची दर्शनासाठी रांग लागलेली असते. काळबादेवी श्री देव रामेश्वराची बहीण असल्याने तेथे माऊबिजेचा कार्यक्रम केला जातो.

पुढे ही पालखी मालवण शहराच्या मध्यभागी असलेल्या रामेश्वर मांडावर लोकांच्या दर्शनासाठी थांबते. तेथे भक्तांना प्रसाद वाटला जातो. मालवणातील बाजारपेठेत यावेळी खूप गर्दी असते. या निमित्ताने पेठेत आर्थिक देवघेव होते. नंतर ही पालखी ढोल ताशाच्या गजरात वाजत गाजत प्रत्येकाच्या घरी थांबते. मालवणातील रहिवासी मोठ्या श्रद्धेने या पालखीचे दर्शन घेतात. त्यानंतर ही पालखी पूर्ण मालवणात फिरून देऊळवाड्यात जाण्यास निघते. अशाप्रकारे मालवणात दिवाळी पाडवा साजरा केला जातो. हा मालवणातील आगळा-वेगळा सण मानला जातो.

- सिया प्र. भंडारी
९वी 'अ'



# खेळ रंगला.....



आपल्याला आपल्या आयुष्यात अनेक क्षणांना सामोरे जावे लागते. त्यातील काही क्षण आनंदाचे तर काही दु:खाचे असतात. माझ्या आयुष्यातील बरेच क्षण आनंदाचे आहेत. ते सर्व मला इथे मांडता येणार नाहीत. पण त्यातील एक क्षण जो मी कधीच विसरू शकणार नाही. त्यावेळी मी इयत्ता सातवीत होते. 22, 23, 24 डिसेंबरला आमचा 'क्रीडा महोत्सव' होता. त्यामुळे सर्व विद्यार्थी ज्यांनी स्पर्धांमध्ये भाग घेतला होता, ते उत्सुक होते. आपापल्या परीने स्पर्धेची तयार करत होते. त्याप्रमाणे माझ्या वर्गातील सर्वजण कसून तयारी करत होते. 'अ' वर्गातील मुलांची आणि 'ब' वर्गातील मुलांचा कबड्डीचा सामना म्हणजे प्रतिष्ठेची लढत होती. हा कबड्डीचा सामना झाला. आणि आमचं दुर्दैव की आम्ही त्या सामन्यात हरलो. सलग दोन वर्षे जिंकूनही आमच्या वर्गातील मुलगे हरले होते. त्यामुळे आता 'अ' वर्गाची साणबाणशान आता फक्त मुलींच्या हाती होती.

पण आधीच्या दोनही वर्षी आम्ही कबड्डीत हरलो असल्यामुळे आम्हालाही जिंकू अशी आशा नव्हती. सगळ्यांना हेच वाटत होते की आम्ही पण हरणार. आमची पहिली लढत 'क' वर्गातील मुलींबरोबर होती. त्या वर्गातील काही मुली धिप्पाड होत्या. तसेच आधीच्या दोन्ही वर्षी त्यांनी स्पर्धा जिंकली होती. त्यामुळे आम्हाला वाटले आता आमचे काही खरे नाही. तरी पण सर्व ताकदीनिशी व बुद्धीने खेळून आम्ही तो सामना जिंकला. 'क' वर्गातील मुलींना हरवल्यामुळे आमच्यातील आत्मविश्वास वाढला आणि तोच आम्हाला दुसऱ्या दिवशी होणाऱ्या अंतिम सामन्यासाठी उपयुक्त ठरला.

त्यानंतर दुसऱ्या दिवशी आमची लढत 'ब' वर्गातील मुलींबरोबर होती. आम्ही त्या सामन्यातही विजय संपादन केला. एखाद्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक मिळावे असा आनंद आम्हाला झाला होता. आम्हाला याचा अभिमान होता की आम्ही आमची आण-बाण-शान जपली होती. त्यामुळे माझ्यासाठी तो दिवस नक्कीच चांगला व अविस्मरणीय होता आणि त्यावेळीचा तो दिवस आठवला की अजूनही आनंद होतो. त्यावेळी वाढलेल्या आत्मविश्वासामुळे आम्ही पुढील इयत्तांतील सामने जिंकू याची मला आशा वाटते.



- कृपा शंकर पाटकर
८ वी 'अ'

# दिवाळी

आली दिवाळीची सुट्टी
करुया मौजमजा मोठी
'स्वच्छ दिवाळी' करु साजरी
नसणार कोणी आजारी.

अभ्यंगस्नान आणि सुगंधी उटणं
मुलांना आवडतं फटाके फोडणं
समोर येते फराळाचे ताट !
खमंग पदार्थांचा असतो थाट....!!

घरी येताच पाहुणे-रावळे
पिशवी हातात भरलेली खाऊने
अशीच असते दिवाळीची सुट्टी
सुट्टीत असते मौजमजा मोठी.....!



- योगिनी विनायक जाधव.
आठवी (अ)



# झाली नोटबंदी



झाली नोटबंदी झाली नोटबंदी
धंद्यामध्ये मंदी आली, धंद्यामध्ये मंदी

गेले पाचशे आणि हजार
सगळे सुट्ट्यांसाठी बेजार

बँकेसमोर भल्या रांगा
कुठे मिळतील सुटे सांगा?

म्हणतात होऊ 'कॅशलेस'
पैसे नाहीत कापायला केस!!!

बंद झाली हजाराची नोट
बँकेमध्ये रंगवले बोट!

कधी येणार 'अच्छे दिन'?
ब्लॅक वाले मात्र दीन!!!

ATM ला लागली नजर
आजतागायत नोट नाही हजर!

- दर्श बलराम सामंत.
सहावी (अ)




कु. मंदार मिलिंद शिरोडकर  अकरावी, कला  ५

# माणसा, माणसा, कधी होशील रे 'माणूस'?

या पृथ्वीवर राहण्याचा समानाधिकार सर्वांनाच आहे. निसर्ग, पशुपक्षी, मत्स्यजीवन आणि मानवजात हे मालक असतानाही माणूस स्वार्थी का बनतो? का वागतो? पृथ्वीसंपत्तीवर केवळ आपलाच अधिकार असल्यासारखं त्याला का वाटतं? इतरांना तो तुच्छ का लेखतो? या प्रश्नांची उत्तरं सापडणं दिवसेंदिवस कठीण होत चाललंय. हल्ली जग कुठं चाललंय, तेच समजेनासं झालंय.

मुक्या प्राण्यांवर होणारे अत्याचार वाढत चालले आहेत. वर्तमानपत्र, इंटरनेट, मोबाईल ॲप्स आणि चारही बाजूंनी कानांवर येणाऱ्या अत्याचारांच्या बातम्यांनी मन सुन्न आणि बधीर होत आहे. ज्यांची भाषा आपल्याला समजत नाही आणि ज्यांना आपली, त्या मुक्या जिवांसोबत माणसांनी इतकं वाईट वागावं? जिवंतपणी त्यांचे हाल हाल करून त्यांना ठार करावं?

'हलाल' हा शब्द सुद्धा हाल हाल शब्दावरूनच आला असावा, अशी मला दाट शंका येते. कोंबडीकुत्री, गाईम्हैशी, हत्तीघोडे, बकऱ्यामेंढ्या, वाघसिंह, उंटगाढव, गावडुक्कर, माकडं, ससे, उंदीर, मुंगूस, घोरपडी, मगरीसुसरी यांच्या जीवावर उठलेला 'माणूस' नावाचा प्राणी आपलं काळीज हरवून बसलाय. वन्य पशुपक्ष्यांना पिंजऱ्यात डांबून त्यांच्या स्वच्छंद स्वातंत्र्यावर घाला घालणारी मानवजात. प्रयोगशाळेत जनावरांवर केले जाणारे अमानुष प्रयोग, पाळीव पशूंची तस्करी, मानवी जिभेच्या चोचल्यांसाठी होणारी प्राण्यांची बेहिशेबी कत्तल, औषधांच्या नावाखाली प्राण्यांची केली जाणारी हत्या, हे सारं वाचून, पाहून आणि ऐकून काळीज अगदी थरथरतं. हे कमी होतं की काय म्हणून आता सर्वसामान्य मुलं-माणसंही मिळेल त्या जनावरांचे हालहाल करून त्यांना जिवे मारण्यात धन्यता मानू लागलीत. इतकंच नव्हे तर साऱ्या हिंसक, हिंस्र आणि हिणकस प्रकारांचं व्हीडियो शूटिंग करून ते साऱ्या जगाला दाखवण्यातही मोठेपणा मानू लागली आहेत. कुठे चाललोय आपण? या सगळ्यांवर 'बहिणाबाईंनी' माणसाला प्रश्न विचारला, 'अरे मानसा मानसा, कधी व्हशील मानूस?' हा प्रश्न विचारून अनेक दशके लोटली; पण अद्याप या प्रश्नाचे उत्तर माणसाला मिळालंय, असे वाटत नाही. कारण ज्याला हा प्रश्न विचारला त्याला 'माणूसपण' म्हणजे काय हे समजलंय असे वाटत नाही. समजले असते तर माणूसपणाची आठवण करून द्यायची गरजच लागली नसती.

माणूस जसा दिसतो तसा असेलच याची खात्री देता येत नाही. त्याच्याकडे सामाजिक संस्कारांची श्रीमंती किती, याचे मोजमापही करता येत नाही. 'माणूस' ही निसर्गाची सर्वश्रेष्ठ देणगी आहे, असे म्हणताना कितीही चांगले वाटत असले तरी याची खात्री देणे अवघड आहे. म्हणून माणसाला ओळखताना हातातून काहीतरी निसटतेच.



मनात प्रेम असल्याशिवाय आपण दुसऱ्याचे मन समजू शकत नाही

संत बहिणाबाईंनी माणसाला, माणसासारखेच वागायला सांगितले आहे त्या म्हणतात,

मानसा, मानसा, कधी व्हशील मानूस,
निसर्गाच्या प्रकोपाला, जकी मोडून मानूस

- कु. नम्रता महादेव चव्हाण
बारावी (वाणिज्य)



प्राणिमात्रांवर हृदयपूर्वक प्रेम करणे हीच खरी मानवता आहे.

# जाणीव



आज पुन्हा जाणीव झाली...
कुणीतरी आहे, जिच्यासाठी मला जगायचंय...
जिने मला जगवलं, तिच्यासाठी मरायचंय !
नको ही खोट्या दुनियेतील खोटी सुखं..
बस्स, तिला खरंच सुखात बघायचंय...!

तिच्या चेहऱ्यावरच्या आनंदासाठी
मेहनत कष्ट मला करायचेत
जिने आपल्या तोंडातला घास काढून
मला दिला, तिला पोटभर जेवण भरवायचंय
तिच्यासारखं, स्वतः उपाशी राहून दुसऱ्याला
जेवताना बघायचंय !

आज पुन्हा एकदा जाणीव झाली
कुणीतरी आहे, जिच्यासाठी मला जगायचंय...
जिने आपली स्वप्न अपूर्ण ठेवून
माझी स्वप्न पूर्ण केली, तिचं एक तरी
स्वप्न पूर्ण करायचंय !!



जिने ह्या दुनियेत मला मोठं केलं
तिला आता मला मानाचं स्थान
मिळवून द्यायचंय, तिच्यासारखं बनून
मला तिलाच सुखात ठेवायचंय
तिच्यासारखेच कष्ट करून मला तिलाच
आनंदात ठेवायचंय!

जग पुढे जात असताना मात्र मला
तिच्यासोबतच राहायचंय
पण तिच्या इच्छेसाठी मात्र,
ह्या जगाबरोबर चालायचंय !

एक स्त्री शिकली तर सारे कुटुंब शिक्षित होते



एवढं केलं तिने माझ्यासाठी
आता मला तिच्यासाठी काहीतरी
करायचंय, तिला हसत ठेवण्यासाठी
आता मला मोठं व्हायचंय !

मन थोडसं रुसत असताना
हसत हसत तिला सांभाळायचंय
तिचा सांभाळ करताना, लहान मुलासारखं
तिला जपायचंय!

आतापर्यंत ती आई होती
आता मला तिची आई व्हायचंय...
बोट धरून चालायला शिकवलं तिने
आता मलाच तिचा आधार
बनून चालायचंय !

आज पुन्हा एकदा जाणीव
झाली, कुणीतरी आहे जिच्यासाठी
मला जगायचंय.....!

- कु. यशश्री गणेशावरक
बारावी (कला)





कु. विठ्ठल रामदास डिचोलकर . नववी, अ

# गंमत नावातील

महान नाटककार 'शेक्सपिअर' म्हणायचा, 'नावात काय आहे?' पण खरं सांगायचं झालं, तर नावातच सर्वकाही आहे. नाव तर आपली ओळख असते. मात्र, नावातसुद्धा अनेक गमतीजमती असतात. 'नाव सोनूबाई हाती कथलाचा वाळा' या म्हणीप्रमाणे एखाद्या व्यक्तीचे नाव हे 'राजा' असते मात्र तो परिस्थितीने एवढा गरीब असतो की त्याचे दोन वेळच्या जेवणाचेदेखील हाल असतात. काही जणांची 'नावे' ही अशी असतात की ती त्या व्यक्तींच्या स्वभावाला अजिबात शोभत नाहीत. तर काहींची नावे ही त्यांच्या शरीरयष्टीलाही मुळीच शोभत नाहीत. काहींचे आईवडील मोठ्या कौतुकाने त्यांच्या मुलांना एखाद्या वीराचे वा देशाचे, देवाचे नाव ठेवतात. मात्र, प्रत्यक्षात ते मूल जीवनात कोणताही पराक्रम वा त्या 'नावाला शोभेल' अशी कामगिरी करत नाहीत. उलट त्यांचे वर्तन काही औरच असते. पण काही वेळा हीच मुले ही त्यांच्या नावाला साजेशी कामगिरी करतात व त्यांचे कौतुकही होते. जसे की स्वामी विवेकानंद, बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले या व्यक्तींनी त्यांच्या जीवनात एवढी महान कार्ये केली, जगाला संबोधित केले की त्यांचे 'नाव' हीच एक मोठी पदवी बनली.

हे खरे आहे की, नावातच सर्वकाही आहे. जसे एखाद्या गावाचे, शहराचे 'नाव' हे त्या ठिकाणची संस्कृती, उपलब्धता यांची थोडक्यात ओळख करून देते. जसे की आपले 'मालवण' म्हणजेच 'महालवण'. जेथे 'लवण' म्हणजे 'मीठ' मोठ्या प्रमाणात मिळते ते 'महालवण'. मा-लवण 'मा' म्हणजे 'नको', 'लवण' म्हणजे 'मीठ' अर्थात मिठाची गरज नसलेले ते 'मालवण'. 'मा' म्हणजे 'लक्ष्मी', 'लवण' म्हणजे 'मीठ' अर्थात मिठाने 'पैसा' मिळवून दिला ते गाव 'मालवण'.

त्याचप्रमाणे विचारपूर्वक ठेवलेली ठिकाणांची नावे त्या ठिकाणी घडलेल्या इतिहासाची आठवण करून देतात. जसे की 'प्रतापगड', महाराजांनी खानाचा जेथे वध करून प्रताप घडवला. 'तोरणा' म्हणजे जो गड जिंकून महाराजांनी 'स्वराज्याचे तोरण' बांधले. इ. या सर्वांप्रमाणेच 'नाव' ही आपली जणू दुसरी ओळख असते. जर आपल्याला नावेच ठेवली गेली नसतील तर आपण एकमेकांना ओळखायचे तरी कसे? सांगा, सांगा!!!

## बिघडलो

– अदिती आनंद कुडतरकर
नववी 'अ'

# आम्ही मालवणी



शिवाजी महाराजांनी ठेवलो पाय
तेवा सिंधुदुर्गाचा झाला 'नाव'

समुद्रात गावता मरणाची मासळी
आंबे, काजी, फणसाची साखळीच साखळी !

करवंदा, आभळ ह्यो मालवणी मेवो
'मालवणी' भाषा ह्यो मालवणचो ठेवो

मालवण मुलखात फिराक येवा
मटान आणि मासे चापून खावा.

- कौस्तुभ सुदर्शन नाईक.
दहावी 'ड'

# आयुष्य

आयुष्य म्हणजे खेळ नव्हे
फुकट मिळालेला वेळ नव्हे

आयुष्य आहे कोडे
सोडवाल तितके थोडे

म्हणून म्हणतोय .....
आयुष्यात येऊन मिळवावी माणसं
एकमेकांची वाटून घ्यावी सुखदुःखं ....

- तेजस लक्ष्मण भगत.
दहावी 'क'



माणूस स्वतःच स्वतःचा भाग्यविधाता असतो.

# सौंदर्य



माणूस म्हटला की मग तो कोणत्याही जातीचा, धर्माचा, पंथाचा असो त्याचे 'सौंदर्य' बघितलेच जाते. तो गोरा, सावळा, काळा, जाडा, बारीक, मध्यम, कुरूप, सुंदर असे अनेक भेद केले जातात. आफ्रिकेमध्ये तर रंगावरून काळा व गोरा असे दोन गट केले जात असत.

बहुधा असे होते की आपण आधी मुखाद्वारे सौंदर्य पाहतो व मग त्याचे गुण. नवरदेवासाठी वधू निवडताना पहिल्यांदा आपण तिचे फोटो पाहतो. ती जर सौंदर्याने मढवलेली अप्सरा असेल, तरच आपण तिला प्रत्यक्षात भेटतो; पण आपण तिच्यातले चांगले गुण एकदाही पारखत नाही.

प्रत्येक माणसाला आंतरिक सौंदर्यापेक्षा बाह्यसौंदर्य आकर्षित करते. बाह्यसौंदर्य हे क्षणिक असते; पण आंतरिक सौंदर्य मात्र चिरकाल टिकणारे असते. आपले आंतरिक सौंदर्य हळूहळू आपल्याला एक संस्कारक्षम माणूस बनवण्यास कारणीभूत ठरते. बाह्य सौंदर्य कालांतराने नष्ट होते; पण आंतरिक सौंदर्य आपले जीवन अधिक समृद्ध बनवते.

आंतरिक सौंदर्याला वाईट संगत, व्यसने, दुष्कृत्ये यांच्यापासून दूर ठेवले पाहिजे. कोणत्याही प्रकारच्या वाईट घटनांमुळे, बाबींमुळे आंतरिक सौंदर्याला धक्का पोचवणार नाही याची काळजी, जबाबदारी प्रत्येक व्यक्तीने घेतली पाहिजे.

आंतरिक सौंदर्याचा मुख्य भाग म्हणजे 'मन'. मनाचा उल्लेख असा करतात की, शरीरावर संयम, नियंत्रण राखण्यासाठी देवाकडून मिळालेली एक गोष्ट. मानवी मनावर चांगले संस्कार केले असता ते संस्कारक्षम बनते. मन हे केवल एक 'मातीचा गोळा' असते. जसा कुंभार त्या गोळ्याचा वेडावाकडा योग्य आकार देऊन सुंदर, अप्रतिम मातीची भांडी, वस्तू बनवू शकतो, तसा तो त्या मातीच्या गोळ्याला वेडावाकडा आकारही देऊ शकतो. तसेच मनाचे असते. मन संस्कारित केले असता जीवन जगणे सुलभ होते; पण मन व्यसन, खून, मारामाऱ्या, चोऱ्या, गुन्हे इत्यादी वाईट गोष्टींच्या आहारी गेले असता आयुष्याची वाट लागते.

शेवटी माणसांचे चेहरे पाहू नयेत. कोणत्याही माणसाच्या मनात शिरून त्या पूर्णतः समजून घेणे. जितकी माणसे तितके त्यांचे स्वभाव. हे जग जितके चांगले आहे तितकेच वाईट ही आहे. तितकेच ते वाईट प्रवृत्तीच्या माणसांमुळे ते घातकही आहे. तरी आपण आपल्या मनाला योग्य वळण देऊन एक आनंदी जीवन जगू शकतो.

आपण इतरांच्या सौंदर्यातील दोष शोधण्यापेक्षा आपल्या आंतरिक सौंदर्यातील गुणांचा, कलांचा शोध घ्यायला हवा. त्या विशिष्ट कलांमध्ये नैपुण्य, विशेष प्राविण्य प्राप्त करायला हवे. ज्या त्या माणसाने रंग, रूप, चेहरा पाहून त्याला 'अ' श्रेणी, 'ब' श्रेणी, 'क' श्रेणी देऊ नये. आंतरिक सौंदर्याइतके बाह्य सौंदर्याकडेही लक्ष देणे गरजेचे आहे.

-देवश्री उज्ज्वल मुरकणे
अकरावी (वाणिज्य)

अंतःकरणाची सुंदरता सुंदर विचारांतून प्रगट होते.

# एक मैत्रीण अशीही असावी




एक तरी मैत्रीण असावी
चारचौघीत उठून दिसावी
बोलली नाही तरी निदान
समोर बघून गोड हसावी!

एकतरी मैत्रीण असावी
जिच्याशी निर्मळ संवाद असावा
कधीतरी छोट्या भांडणाचा
एखादाच अपवाद असावा...

एक तरी मैत्रीण असावी
आयुष्याच्या अनोख्या वळणांवर
तुमच्या व्यथा वेदनांवर
तिने हळूच फुंकर घालावी....

एक तरी मैत्रीण असावी
चांदणीसारखी, मैत्रीच्या आकाशात
मित्रांचे दिवे मावळले म्हणजे
चालावं पुढे तिच्याच प्रकाशात....

मी खरंच खूप भाग्यवान आहे की माझी
एक मैत्रीण आहे, अगदी अशीच....




- समिधा तुकाराम म्हाडदळकर
अकरावी वाणिज्य



कु. गणेश राजेंद्र परब नववी, अ

# बंडोपंत फूल तोडे



आमच्या प्रभाकाकूंना बागेचा फार शौक. सकाळ, संध्याकाळ मेहनत घेऊन, व्यवस्थित खतपाणी घालून, त्यांनी त्यांची बाग निरनिराळ्या फुलझाडांनी खूपच छान सजवली होती. 'काकूंची बाग' म्हणजे सोसायटीत चर्चेचा विषय होता. त्यांच्याकडे आलेला पाहुणा हा काकूंची बाग बघितल्याशिवाय जातच नसे. म्हणजे काकू त्याला सोडतच नसत. फक्त एक गोष्ट त्यांना कायम सतावत असायची. ती म्हणजे त्यांच्या शेजारचा 'बंडू'. अवघ्या चार वर्षांचा. तो काकूंना फारच हैराण करायचा।

या बंड्याला फूल दिसलं की काहीतरी व्हायचं. फूल कधी एकदा तोडतोय, असं त्याला व्हायचं. फुलासाठी त्याचा जीव कासावीस व्हायचा. रडून रडून त्याच्या बरोबर असलेल्या व्यक्तीला ते काढायला लावायचा आणि एकदा का ते फूल हातात आलं की, त्याच्या पाकळ्या कुसकरल्या जायच्या. हा बंड्या काकूंच्या अगदी शेजारीच रहायचा. हा सगळा प्रकार काकूंची पुतणी मंजू नेहमी बघायची पण नेहमी दुर्लक्ष करायची. कारण तो मुलगा इतका गोड होता की, त्याच्या विरुद्ध काही करणे तिला जमायचेच नाही. काकूंना घाबरवायला ती मधूनमधून "काकू बंड्या आला बरं का!" असे म्हणायची.

पण या सगळ्यात बिचाऱ्या काकूंचा मात्र कोंडमारा होत असे. शेवटी मंजूला काकूंची होणारी तगमग जाणवली व तिने ह्यावर काहीतरी उपाय शोधायचा असे ठरवले.

एके दिवशी बंडोपंत आपल्या आईच्या कडेवर बसून फिरायला निघाले. वाटेत काकूंची बाग नेहमीप्रमाणे लागली. मंजू याच संधीची वाट बघत होती. तिने पटकन पुढे जाऊन विचारले, "बंडू, येतोस फिरायला? फूल बघायला?" फुलांचे नाव काढल्यावर बंडू लगेचच मंजूकडे आला. मंजूने त्याला वेगवेगळी फुले दाखवायला सुरुवात केली. प्रत्येक फूल बघताना बंडूचा हात पुढे सरसावत होता. मंजूने मात्र त्याकडे लक्ष दिले नाही. तिने उलटे सांगायला सुरुवात केली. "बंडू तुला माहितेय? ही फुलं ना, खूप नाजूक असतात. त्यात गोड गोड मध असतो व हा मध चाखायला मधमाश्या येतात. या मधमाश्यांमुळेच ही फुलझाडं टवटवीत दिसतात व लवकर कोमेजत नाहीत. आपण ही फुलं तोडली तर मधमाश्या मरुन जातील आणि मधमाश्या मेल्या तर आपल्याला त्यांच्या    कडून जो मध मिळतो तो मिळणारच नाही त्यामुळे त्यात आपलेच नुकसान आहे." पण छे! हे ऐकूनसुद्धा बंडोपंतात फरक पडला नव्हता. तो आपला फूल फूल करत होता.



तेवढ्यात मंजूला अजून एक युक्ती सुचली. ती म्हणाली, "बंड्या ते फूल बघ किती छान आहे. ते झाड आहे ना त्याने त्या फुलाला कडेवर घेतलंय. ते फूल म्हणजे बाळ आणि झाड म्हणजे त्याची आई. हे बघ मी तुला तुझी इच्छा नसताना कडेवरुन उतरवलं तर तू रडशील. तसंच कोणी झाडावरचं फूल तोडलं तर झाडालापण आवडणार नाही आणि फुलालाही वाईट वाटेल.

बंडूचे डोळे चमकले. त्याच्या डोळ्यात 'अरे बापरे' असे भाव मंजूला जाणवले. मंजूचा बाण अचूक जागी लागला होता. तेव्हापासून बंडू रोज झाडांना मायेने कुरवाळू लागला. त्याने कधीच झाडावरचे फूल चुकूनही तोडले नाही.

-एकता दत्तप्रसाद खानोलकर
नववी 'अ'

# आजी, आजोबा घरी या!



आजचं कुटुंब म्हणजे
हम दो हमारा एक !
आजी - आजोबांना
पाठवतात आश्रमात थेट !
निबंधाचे विषय असतात
आई आणि बाबा
कधीतरी विषय द्या
आजी आणि आजोबा
आजीच्या गोष्टींशिवाय
आजोबांच्या प्रेमाशिवाय
जीवनाला नाही अर्थ
तेच नसतील आपल्याजवळ
तर जीवन आहे व्यर्थ
अशा या प्रेमळ अवखळ नात्यास
विसरु नका कधी
आजी आजोबांची कृपादृष्टी
राहील तुमच्या माथी.

- चंदना दि. डिचवलकर
४ थी 'ब'



# एक होता ससा...



एक होता ससा
सांगा पाहू कसा ?
पांढरा पांढरा रंग
अन् मऊ मऊ अंग
मोठे मोठे कान
लाल लाल डोळे छान
काय बरे खातो ?
गवत मात्र दिसतो |
धीट नाही तसा
असा हा ससा
चाहूल लागताच पळतो
झाडा-झुडपात लपतो
तुरु तुरु त्याची चाल
पहाल तर थक्क व्हाल
असा हा ससा
ह्याला खूप हसा !!!

- सानिया स. आजगावकर
४ थी 'अ'

# अजब दुनिया

आज क्षणभर डोळे मिटून पाहिले तर दिसते ती आजची अजब दुनिया, तो बिघडत चाललेला समाज आणि ती बिघडत चाललेली पिढी. जिकडे पहावं तिकडे अंदाधुंदी माजली आहे. खून, मारामाऱ्या, लूटमार, बलात्कार यांसारख्या प्रकारांनी तर सारी दुनियाच दुमदुमते आहे.

आज काल मरणही स्वस्त झालं आहे. माणूस समोर दिसतो काय आणि अटॅक येतो काय ही वस्तुस्थितीच आहे. आज माणूसच माणसाचा शत्रू झाला आहे. अशा कितीतरीच घटना क्षणाक्षणाला समाजात घडत आहेत की ज्यामुळे माणसाला माणसाची ओळख राहिलेली नाही हे सिद्ध होत आहे.

जिंदगी एक सफर है सुहाना,
यहाँ कल क्या होगा किसने जाना।

सध्याच्या परिस्थितीत माणूस स्वतःचीच गॅरंटी देऊ शकत नाही. आज काय घडतंय आणि उद्या काय घडेल यची शाश्वती नाही आहे. सकाळी सुस्थितीत बाहेर पडलेली व्यक्ती संध्याकाळी घरी व्यवस्थित परत येईल, हे देखील सांगता येत नाही. जीवाभावाचे मित्रही एकमेकांचे शत्रू बनलाहेत; कारण काय तर 'पैसा'. आजची दुनिया ही पैशावर चालतेय. नाती-गोती पैशांसाठी टिकतात आणि पैशामुळेच तुटतातही. पैशासाठी माणसे जवळ येतात आणि पैशासाठी दूर जातात. ज्याच्याकडे गडगंज संपत्ती आहे, त्याच्याकडे पुष्कळ माणसे गोळा होतात; पण जो आर्थिकदृष्ट्या दुर्बल आहे, गरीब आहे त्याच्याकडे पाहायलाही कुणाला वेळ नसतो. स्वतःची रक्ताची माणसे-सुद्धा पैशापुढे माणसाला परकी वाटू लागली आहेत. आपलीच माणसे आपल्या माणसांच्या जीवावर उठली आहेत. आणि म्हणे हे 'कलियुग' आहे.

आज काल आई-बापही स्वस्त झाले आहेत. यापुढे तर आई-बाप जन्म देण्यापुरतेच मर्यादित राहतील. एवढेच कशाला तर आपले आई-बाप कोण? हाही प्रश्न उद्भवण्यास मागेपुढे होणार नाही. सध्या 'आई' या शब्दाची व्याख्याच बदललीय. 'आई' या पवित्र शब्दाला कालिमा फासला जातोय. आज आई-बापाला मुलांच्या हातापाया पडावं लागतंय. मुलांना घाबरावं लागतंय. आपले आई-वडील रक्ताचं पाणी करून मुलांना वाढवतात; पण ही मुलंच त्यांना शेवटी वृद्धाश्रमात ठेवतात, ही मनाला वाटणारी दुःखद गोष्ट आहे.

मुलांनी हाही विचार जरूर करायला हवा की आई-बाबांनी आपल्याला जन्म दिला म्हणजे आपली सर्वस्वी जबाबदारी त्यांच्यावरच आहे का? आपल्याला हेही कळायला हवं की, आपल्यालाही केव्हातरी आई-बाप नावाची जबाबदारी पार पाडायची आहे. तर मग आपणच आपल्या आई-बाबांना वाईट वागणूक दिली तर पुढे आपली मुलंही आपल्याला त्यांच्यापेक्षाही वाईट वागणूक देतील; कारण कळत नकळत आपल्याही मुलांवर हेच वाईट संस्कार होतील.

आजच्या या अजब दुनियेत बेकारीसारखा गंभीर प्रश्न उभा आहे. बेकारीच माणसाला सगळं करायला

खरा आनंद दुसऱ्याला आनंद देण्यात असतो, घेण्यात किंवा मागण्यात नसतो.

भाग वाढत आहे. बेकारीमुळे अनेक गोष्टी घडत आहेत. अनेक सुशिक्षित लोक बेकार म्हणून फिरत आहेत आणि या बेकारीमुळेच आत्महत्यांचं प्रमाण वाढत चालले आहे. सगळीकडे नुसती अंधाधुंदी माजली आहे. पैसे नसणारा माणूस निश्चितपणे झोपू तरी शकतो, मात्र पैसे असणारा माणूस शांतपणे झोपूही शकत नाही; कारण अति पैसा सुद्धा काळजीत टाकतो. समाजात चाललेली उन्मतगिरी ही सुद्धा पैशाच्या जोरावर वाढत चाललीय. माणूस पैशाच्या जोरावर काय करेल हे सांगताही येणार नाही. श्रम कमी व पैसा जास्त अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. आणि या परिस्थितीचा केव्हातरी विस्फोट हा होणारच ! कधीतरी ही सारी दुनियाच नष्ट होणार आहे आणि या सर्वाला जबाबदार असू ते फक्त 'आपणच'.

आपण नेहमी म्हणतो जगबुडी येणार, जगबुडी येणार ! मग हे चाललंय ते काय आहे ? सध्य परिस्थिती हीच खरी तर एक प्रकारची जगबुडीच आहे !

पैशासाठी माणूस स्वतःचं शील विकण्यास तयार झालाय आणि हे करण्यात त्याला कमीपणा वाटत नाही. या दुनियेत सत्याला कुठेच वाव नाही. जो सत्याने चालतो, सत्याने वागतो त्याला जास्त दुःख अशी दुनियेची बक्षीस योजना चालली आहे. म्हणजेच असत्याने चालणारा पुढे येतो, मोठा होतो. ही दुनियेची रीतच आहे, हे एक कटू सत्य आहे.

'न भूतो न भविष्यति।'

हे जरी आपल्याला माहीत नसले, तरी भविष्यात येणारी गंभीर परिस्थिती तरी आपल्याला निश्चितच माहीत आहे आणि ही जर परिस्थिती आपल्याला टाळायची असेल तर त्यावरील उपायही आपणच शोधले पाहिजेत. आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो ही भावना प्रत्येकाच्या मनामध्ये रुजली पाहिजे. त्यादृष्टीने चांगले प्रयत्नही व्हायला हवेत. तरच कुठेतरी भविष्यात निर्माण होणाऱ्या परिस्थितीच्या काळ्याकुट्ट भस्मासुराला वेळीच रोखू शकू.

'१५ ऑगस्ट', '२६ जानेवारी' हे राष्ट्रीय सण साजरे केले जातात; पण हे सण नुसतेच साजरे न करता प्रत्येकाने मनामध्ये काहीतरी संकल्प केले पाहिजेत, ते सत्यात उतरवले पाहिजेत; त्यासाठी योग्य ते प्रयत्नही केले पाहिजेत. या सर्वांचा विचार करून मला सुरेश भटांच्या एका कवितेची ओळ आठवते.....




उषः काल होता होता,
काळरात्र झाली,
अरे पुन्हा आयुष्याच्या,
पेटवा मशाली.







- कु. मयुरी सदानंद ठाकूर.
बारावी (कला)

# एका भारतीयाचे स्वगत...



हे भारतभू.....!
आम्हाला आहे तुझा अभिमान!
पण.... आज.....
सरकारी अधिकारी आहेत बेईमान!
त्यांना बसावा आळा म्हणून
पंतप्रधानांनी केले विमुद्रीकरण
आणि बदलले त्यांचे राहणीमान!

हे भारतभू.....!
आम्हाला आहे तुझा अभिमान!
कारण तुझ्यात असलेल्या राम-कृष्णांचा
राखला जात होता मान
पण, आज..... स्त्रियांना रस्त्यावरून
एकटे चालणे आहे.... मुश्कील!

हे भारतभू.....।
आम्ही नाही राखू शकलो.....
तुझ्या संपन्न परंपरांचा मान
करु शकशील तर, कर माफ आम्हाला
एवढीच विनंती तुला.... हे भारतभू.....!

-शुभदा सखाराम शेटवे
नववी (अ)

हे भारतभू.....।
आम्हाला आहे तुझा अभिमान!
कारण ऑलिम्पिकमध्ये......
पि.व्ही.सिंधूने
'रौप्यपदक' जिंकत वाढवली तुझी शान!
कोहलीने फटकावत चेंडू....
उंच केली तुझी मान!
यश खेचून दिव्यांगांनी
इतिहासात रचले सुवर्णपान!

# दुर्गबत्तिशी सिंधुदुर्गाची

*धन्वदुर्गं महीदुर्गमब्दुर्गं वार्क्षमेव वा, नृदुर्गं गिरिदुर्गं वा समाश्रित्य वसेत् पुरम् ।*
*सर्वेण तु प्रयत्नेन गिरिदुर्गं समाश्रयेत्, एषां हि बाहुगुण्येन गिरिदुर्गं विशिष्यते ॥*



मनुस्मृतीत दुर्गांचे सहा प्रकार उल्लेख केलेले आहेत. धनुदुर्ग (सभोवार वीस कोसांपर्यंत उदकरहित प्रदेश असलेला दुर्ग), महिदुर्ग (बारा हातांहून उंच अशा तटबंदी, गवाक्षादिकांनी परिपूर्ण असा दुर्ग), अब्दुर्ग (पाण्याने परिवेष्टित असा दुर्ग), नृदुर्ग (हत्ती, घोडे, रथ पायदळ यांनी रक्षिलेला असा दुर्ग), गिरिदुर्ग (उंच पर्वतावर पुरेसा जलसंचय व खडतर वाटमार्ग असलेला दुर्ग). प्राचीन काळापासून भारतातील दख्खन किंवा महाराष्ट्र या नावाने ओळखल्या जाणाऱ्या राष्ट्रात पश्चिमेकडील 'कोंकण' हा एक सुभा होता व या सुभ्याचे पोटी 'कुडाळ' व 'भीमगड' या नावाचे दोन परगणे होते. आज सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून जाहीर झाला आहे. इतिहास काळाचे साक्षीदार असणाऱ्या गड-कोट-किल्ले-दुर्ग आणि गढ्या यांची संख्या या जिल्ह्यात कमी नाही. परंतु किल्ल्यांची दुर्गबत्तिशी सामान्यांना अपरिचित राहिली आहे म्हणूनच तालुकावार या ऐतिहासिक वास्तूंची नोंद....

## मालवण तालुका

१) रामगड – गिरिदुर्ग
२) सिद्धगड – गिरिदुर्ग
३) भगवंतगड – गिरिदुर्ग
४) भरतगड – गिरिदुर्ग
५) सर्जेकोट – सागरीदुर्ग, कनारी कोट
६) राजकोट – सागरीदुर्ग, कनारी कोट
७) पद्मगड – जलदुर्ग
८) सिंधुदुर्ग – जलदुर्ग
९) नांदोस – भुईकोट
१०) वेताळगड – गिरिदुर्ग

## देवगड तालुका

१) विजयदुर्ग – सागरीदुर्ग
२) देवगड – सागरीदुर्ग
३) सदानंदगड – गिरिदुर्ग
४) कोटकामते – भुईकोट

## दोडामार्ग तालुका

१) हनुमंतगड – गिरिदुर्ग
२) आवाडे कोट – भुईकोट
३) मणेरी – भुईकोट
४)

### सावंतवाडी तालुका

१) मनोहरगड - गिरिदुर्ग
२) मनसंतोषगड - गिरिदुर्ग
३) नारायणगड - गिरिदुर्ग, वनदुर्ग
४) महादेवगड - गिरिदुर्ग, वनदुर्ग
५) बांदा - भुईकोट
६) सावंतवाडी कोट - भुईकोट

### सिंधुदुर्गाच्या सीमेवर...

१) प्रसिद्धगड - गिरिदुर्ग
२) पारगड - गिरिदुर्ग

### कणकवली तालुका

१) खारेपाटण - गिरिदुर्ग
२) भैरवगड - गिरिदुर्ग

### कुडाळ तालुका

१) कुडाळकोट - भुईकोट
२) सोनगड - गिरिदुर्ग

### वेंगुर्ले तालुका

१) निवती - गिरिदुर्ग
२) वेंगुर्ले कोट - भुईकोट
४) यशवंतगड - सागरीदुर्ग, कनारी कोट

सिंधुदुर्गातील ही दुर्गबस्तिशी शिलाहार यादव, छत्रपती महाराज, वाडीचे सावंत यांच्या कालखंडात निर्मिली गेली. येथील प्रत्येक किल्ल्याला तेजस्वी, देदीप्यमान इतिहास आहे.

"संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग, दुर्ग नसता मोकळा देश, परचक्र येताच निराश्रय, प्रजाभग्न होऊनउद्ध्वस्त होतो." म्हणूनच सिंधुदुर्गातील हे किल्ले म्हणजे स्वातंत्र्य प्रेरकतेची प्रतिकार शक्तिची व शौर्याची प्रतीके होत. आज २१ व्या शतकात विज्ञान संगणकाच्या युगात या गड - किल्ल्यांचे महत्त्व, उपयुक्तता नष्ट होत आहे. पण म्हणून त्याचे माहात्म्य संपणार नाही. राष्ट्राच्या उज्वल भूतकाळाच्या या प्रतीकांमध्येच आमच्या भावी वैभवाची प्रेरणा शक्ती आहे.

*'शुभचिन्हे ही शिवशाहीची, स्वातंत्र्याची, शक्तीची।*
*रक्तपिपासू सत्तांधांच्या उरी बैसल्या रुद्राची॥'*

संकलन - रजत रविकिरण तोरसकर
९ वी 'अ'





कुमारी. विनिता प्रशांत पांजरी अकरावी, कला

# सैनिक

देशावर खरे प्रेम करणारा
इतर कोणी नसून
एक वीर जवानच असतो
स्वतःच्या जीवावर बेतले तरी
आपल्या मातृभूमीचे रक्षण करतो.
जिवलगांपासून दूर राहतो
त्यांच्या मायेला पोरका होतो
ध्येयाच्या जोरावर,
थंडीवाऱ्यावर मात करतो
शत्रूला तो घाबरत नाही
स्वतःच्या देशासाठी शहीद होतो
ना ख्रिसमस, ना रमजान, ना दिवाळी
रात्र अन् दिवस तो खेळतो रक्ताची होळी
कुठे रक्त अन् कुठे जखमा,
तो सर्व काही सहन करतो
सैनिक हा देशवेडा मातृभूमीसाठीच मरतो
सैनिक म्हणजे मातृभूमीचे
उसळते रक्त
इतर कोणी नसून तोच खरा
देशभक्त ......!



– प्रणय शां. बांदेकर.
दहावी 'अ'

# जीवन



जीवन आहे बुद्धिबळाचा खेळ
जो क्लृप्त्या वापरत नाही तो होतो 'फेल'
कधी कधी कामांचा जमत नाही मेळ
करता काम कळत नाही कसा जातो वेळ
जीवनात कधीही जाऊ नका खचून
तुमच्यासाठीच 'संधी' असतात ठेवलेल्या जपून
जीवन बनवायचे असेल सुंदर, तर
खेळता खेळता पडता नये नात्यांचा विसर
जीवन आहे सलणाऱ्या काट्याप्रमाणे
जीवन आहे आनंददायी मऊ पाकळ्याप्रमाणे!

– समृद्धी भालचंद्र डिचवलकर.
आठवी 'अ'

# माझे बाबा

आजपर्यंत अनेक लेखकांनी अनेक कवींनी आईची थोरवी गायली आहे; पण 'बाबा' हा विषय सोयीस्करपणे म्हणा किंवा नकळतपणे तो दुर्लक्षित राहिला आहे. लहानपणापासून मुलांना आईचीच गरज भासते; तरीही बाबा तेवढेच महत्त्वाचे असतात ना!

पहिला काळ होता, बाबा म्हणजे दरारा; परंतु आज वस्तुस्थिती तशी राहिलेली नाही. बाबा आणि मुलांचे नाते मित्रत्वाचे झाले आहे. शक्यतो हल्ली आई आणि मुलगा व बाबा आणि मुलगी यांची मैत्री हेच समीकरण बनून राहिले आहे. आताची मुलगी जवळजवळ पंचवीस वर्षे आपल्या आई-बाबांच्या सहवासात घालवते. साहजिकच तिला आई-बाबांची ओढ असते. अल्पवयीन मुलींची जेव्हा लग्न होत, तेव्हा मुलगी आईच्याच पदराखालून आलेली असायची, तर तिला बाबांची ओढ कशी असणार? पण आता तसे नाही. आता बाप-लेक यांची मक घट्ट मैत्री झालेली आहे.

२१ व्या शतकात मुलगी सासरी जाताना बाबांसाठी तिचा पाय उंबरठ्यात अडकतो आहे. यावरूनच बाबा आणि मुलगी यांच्या नात्याचा साक्षात्कार होतो.

मलाही माझे बाबा खूप आवडायचे. मी सगळ्यात जास्त त्यांनाच घाबरायचे आणि सगळ्यात मोठा आधारही मला त्यांचाच वाटायचा. 'आपले बाबा आपल्यासोबत आहेत' हे फिलिंगच खूप मोठा आधार देणारं असतं. असं म्हणतात की, 'देवाला सर्व मुलांबरोबर राहता येत नाही म्हणून त्याने 'आई' बनवली; पण मला असं वाटतं, देवाला सर्व मुलांच्या मदतीला धावून जाता येत नाही म्हणून त्याने 'बाबा' बनवले आहेत.

किती भाग्यवान आहेत ती मुलं, ज्यांना बाबा आहेत! मी मात्र त्या बाबतीत दुर्दैवी असावी; कारण बाबा म्हणण्याचे सुख मी जास्त दिवस नाही उपभोगू शकले. मी जेव्हा तेरा वर्षांची होते त्यावेळी माझ्या बाबांना डेंग्यू तापाने घेरले. त्यातच ते स्वर्गवासी झाले. त्यांच्याबद्दल लिहावसं तर खूप काही वाटतंय; पण डोळ्यातले अश्रू काही केल्या थांबत नाहीत आणि हाताने अक्षरे पुढे सरसावत नाहीत.

- मयुरी हुडेर
अकरावी, मम.-सी. व्ही. सी.





# बाबा....



'बाबा' शब्द कानी पडला, मनाला वाटे थांबावा
मनी वाटे असे की, बाबांचा सहवास असावा
बाबा तुम्ही जाऊ नका दूर
माझ्या मनाला वाटे हुरहुर

तुमची येते आठवण फार
जरा वेळ बाजूला ठेवा तुमचा कारभार
तुमच्याशिवाय घर रिकामे रिकामे वाटते
आलात तरी दोन दिवसात घर आनंदाने बहरते

कधी येणार तुम्ही कायम राहण्यासाठी इथे
नाहीतर मी येणार राहायला तुमच्या तिथे
आलात तरी असता दोन दिवसांसाठी
चूक झाली तरी हातात येत नाही काठी

वाढदिवसाच्या दिवशी पण येत नाही कसे
तुम्ही येत नाही म्हणून डोळ्यात पाणी असे
तुम्ही कधी नाही, असा दिवस कधी नसावा
मनी वाटते असे की, बाबांचा सहवास असावा...
बाबांचा सहवास असावा....

- गायत्री जयवंत मयेकर
अकरावी - वाणिज्य

# बोधगीत

केवळ आपुल्या स्वार्थासाठी, कलह नसावा घरामध्ये।
आपुलकीच्या नात्यामधूनी, स्नेह जपावा मनामध्ये।।धृ।।
येणाऱ्याला पाणी द्यावे, मुखात वाणी गोड हवी।
जाणाऱ्याच्या मनात फिरूनी, येण्याविषयी ओढ हवी।।
ऐसा प्रेमळ माणुसकीचा, झरा वाहावा मनामध्ये।
भांड्याला लागलेच भांडे, विसरूनी जावे क्षणामध्ये।।
परस्परांना समजून घ्यावे, अढी नसावी मनामध्ये।
रुसवे फुगवे नको फुकाचे, मोह राहावा मनामध्ये।।
नित्य काळजी घरात घ्यावी, वय आलेल्या पानांची।
ज्याची त्याला द्यावी जागा, वयाप्रमाणे मानाची।।
एक मताने निर्णय घ्यावा, नको दुरावा मनामध्ये।
लक्ष्मी-जिव्हाला आळ असावा, नको उघाळा वरकणी।।
धरू नये गर्व मनाचा, लीन राहावे प्रभुचरणी।
दिवसा राती परमेश्वराचा, वास असावा घरामध्ये।।

कु. गीता अरविंद गाडगीळ
अकरावी - कला



जो स्वतःच्या आणि इतरांच्या कल्याणासाठी झटतो, तो उत्तम पुरुष

# गुन्हेगार



जगाच्या निर्मितीच्या वेळी म्हणजेच ज्या वेळी माणसाचा जन्मदेखील झाला नव्हता, तेव्हा या सृष्टीचे चित्र काही वेगळेच होते. झाडे आपल्या शांत निद्रेत सुखाने एका जागी उभी असत. प्राणी जंगलात खेळत असत. पक्षी झाडांचा आश्रय घेत व आपली भूक मिटवत. फेसाळणाऱ्या समुद्राच्या त्या शुद्ध पाण्यात मासे, आपल्या जलविहारात मग्न असत.
सगळे गुण्यागोविंदाने नांदत होते त्यात, मानवाचा जन्म झाला. सर्वांना वाटले की हा बुद्धिमान प्राणी या वसुंधरेला नटवेल, सजवेल आणि सुंदर बनवेल. मात्र झाले त्याच्या उलटेच. कधीतरी वणवे पेटून जंगलात आग लागायची. मात्र मनुष्य ती आग रोजच लावू लागला. रोज जंगले पेटवू लागला. कधी वाऱ्याने, पुराने एखाद-दुसरे झाड कोलमडून पडे. मात्र हा मानव आपल्या गरजेसाठी रोजच झाडे तोडू लागला. प्रत्येक प्राण्यास आपले भक्ष्य बनवू लागला. फक्त आपली भूक मिटवण्यासाठी! जंगले तोडून सिमेंटचे साम्राज्य उभारू लागला. प्रत्येक प्राण्याच्या निवासात जाऊन तेथे आपली वस्ती स्थापन करू लागला. त्याच्या मनात असा विचार कधी आला नाही की या निष्पाप प्राण्यांचे होणार काय? ते कोठे राहणार? अशा या स्वार्थी मनुष्याने, फक्त आपल्या स्वार्थापोटी पृथ्वीवर हाहाकार माजविला.

शुद्ध हवेस प्रदूषित करू लागला. कारखाने उभे करू लागला आणि विषारी वायू तयार करू लागला. इथवरच तो थांबला नाही तर त्याने या पृथ्वीवर कचऱ्याची पैदास केली. कचऱ्यात असणारा प्रमुख घटक म्हणजे प्लास्टिक. तो या मानवानेच तयार केला. हा विषारी कचरा तो शुद्ध व निर्मळ नद्यांत, समुद्रात सोडू लागला. त्यामुळे तेथे त्याचे दुष्परिणाम दिसू लागले. पाण्यातील जलचर मरण्यास सुरुवात झाली. या मानवाने भूचरांना तर जगायला दिले नव्हतेच तर त्यांनी जलचरांना देखील मारले. या वसुंधरेने या निसर्गात सुंदर गोष्टींची निर्मिती केली. पण या माणसाने त्या सर्व सुंदर गोष्टींना कुरुप केले.

हा माणूस आला होता सृष्टीचा उद्धार करण्यास मात्र, त्याने तर तिला अंताच्या जवळ आणून ठेवले आहे. त्याने जंगले तोडली, समुद्र दूषित केला, पर्यावरणाचा समतोल बिघडवला आणि आता तर तो स्वतःलाच संपवायला निघाला आहे. आता तर त्याने या पृथ्वीचे तुकडे देशामध्ये विभागून स्वतःच्या विनाशाला निमंत्रण दिले आहे.

त्यामुळे आणखी कोणी नाही, तर मानवच आहे का या सृष्टीचा खरा गुन्हेगार?

- आदित्य सुनील वर्दम
दहावी 'अ'

# पावसात



पाऊस आला, सर्दी झाली
चहाच्या दुकानात गर्दी झाली

भिजत आलो आम्ही घरी
आई म्हणाली, थांबा तुम्ही

दुसऱ्या दिवशी ताप आला
औषध घेताच तो गेला

औषध होते फार कडू
प्यायल्यावर ते आलेच रडू

सगळे तलाव पाण्याने भरले
आमचे मन आनंदाने उचंबळले

बेडूक मामा बाहेर आले
डराँव डराँव ओरडू लागले

मासे सगळे नाचू लागले
आनंदाने हसू लागले

पावसात खाऊ नका काहीतरी
सतत सांगत असते आई

आई म्हणाली खाल काकडी
तर तुमची शेंडी होईल वाकडी



- मंदार राजेंद्र केळकर (सातवी)
जय गणेश इंग्लिश मिडियम स्कूल

# फळा..... फळ्याचा

फळा तू फळा
तू आहेस किती काळा
तुझ्यावर गिरवून अक्षर
सगळे होती साक्षर

तू लावून घेतोस लळा
तुझ्याविना नाही चालणार शाळा
तू आहेस काळा
म्हणून तुला म्हणतात फळा

तुझ्यावर लिहून अक्षरे
शिक्षक शिकवतात बरे
तुझा मित्र खडू
नापास झाल्यावर आणतो रडू



जिथे भरते मुलांची शाळा
तिथेच असतो हा फळा
'फळा' आहे माझा 'मित्र'
माझ्या मनात त्याचे चित्र



- केदार कमलाकर तांडेल
आठवी (क)



कु. गौरी उमेश मेस्त्री आठवी, अ

# चौसष्ट कलांमधील एक कला- वक्तृत्व कला



'शतेषु जायते शूरः सहस्रेषु च पण्डितः।
वक्ता दशसहस्रेषु दाता भवति वा न वा ॥'

संस्कृतमधलं हे प्रसिद्ध सुभाषित आहे. शंभरांमध्ये एखादा शूर असतो, हजारांमध्ये एखादाच विद्वान असतो, दहा हजारांमध्ये एखादाच उत्तम वक्ता असतो आणि दाता तर असतो वा नसतोच ; असं सांगणारं हे सुभाषित आहे. हे सुभाषित मुळातच दात्याच्या प्रशंसेचं, दानप्रशंसेचं आहे ; पण वक्त्याचीही महत्ता अधोरेखित करणारं आहे. चांगला वक्ता दहाहजारांत एखादा, अत्यंत दुर्मीळ असतो, असं सांगणारं हे सुभाषित आहे.

चिंतामणी, लंबोदर, विनायक, विघ्नहर्ता, गौरीपुत्र म्हणजेच सृष्टीचा अधिपती 'गणपती.' अशा या गणपतीमध्ये चौदा विद्या आणि चौसष्ट कला वास करत आहेत; पण आजच्या या एकविसाव्या शतकात आपण चौसष्ट कलांपैकी एक तरी कला जोपासू शकतो आणि त्या कलेला आपल्या गुरुजनांच्या साहाय्याने आणि स्वतःच्या कष्टाने योग्य ती दिशा देऊ शकतो. या कलांपैकी एक उत्कृष्ट कला म्हणजे 'वक्तृत्व कला.'

आज समाजात आपल्याला अनेक महान माणसे दिसतात, तर काही माणसे आपल्याला प्रत्यक्षपणे नव्हे तर अप्रत्यक्षपणे अर्थातच पुस्तकांच्या स्वरूपात कीर्तिरूपाने दिसतात. या थोर लोकांची कार्ये भिन्न असली तरी त्यांच्या-पाशी एक अलौकिक सामर्थ्य होतं आणि ते सामर्थ्य म्हणजेच 'वक्तृत्व' कोणतीही कला ही सोपी नसते. त्यासाठी साधना लागते, एकाग्रता लागते, तपश्चर्या लागते आणि यांच्यातीलच एक अविभाज्य घटक म्हणजे परिश्रम !

या परिश्रमाचं आणि त्यातून साध्य होणाऱ्या कलेचे एक सर्वोत्तम उदाहरण म्हणजे एक जगप्रसिद्ध ग्रीक वक्ता 'डेमॉस्थेनीस.' वक्तृत्व कलेसाठी एक अत्यावश्यक घटक म्हणजे स्पष्ट शब्दोच्चार आणि कणखर आवाज ; पण आश्चर्याची बाब म्हणजे डेमॉस्थेनीस हा आरंभी विलक्षण तोतरा होता. तरीही 'आपण एक वक्ता व्हावं ; असं त्याने ठरवले होते. यावर उपाय म्हणून तोंडात गोटे ठेवून तो दूर कोठेतरी निर्जन ठिकाणी डोंगरात जाऊन भाषणे करी आणि हाच डेमॉस्थेनीस पुढे जगप्रसिद्ध वक्ता बनला. जर तोतरा माणूस एवढी प्रगती करू शकतो, तर आपणसुद्धा चांगले वक्ते होऊ शकतो; पण त्यासाठी प्रयत्नांची जोड ही हवीच !

वक्तृत्व कलेची गरज ही प्राचीन काळात होती आणि आधुनिक काळात सुद्धा आहे. प्रत्येकालाच प्रत्येक ठिकाणी आपले विचार मांडण्यासाठी वक्तृत्वाचा आधार घ्यावा लागतो आणि आपले विचार निर्भीडपणे जनतेसमोर मांडण्यासाठी आणि त्या विचारांची जनमानसात छाप पाडण्यासाठी आपल्याला आधार घ्यावा लागतो, तो 'वक्तृत्वकलेचा.' आपण जे बोलू ते अंमलात सुद्धा आणले पाहिजे. नाहीतर 'जगा सांगे ब्रह्मज्ञान आणि आपण कोरडा पाषाण' असं होता नये. सत्याशी प्रतारणा करून चालत नाही आणि वक्त्याच्या विचारांचे

जो कष्ट व साहस करतो तोच विजयी होतो

लोकांवर वजन पडले पाहिजे.

आपले विचार इतरांसमोर मांडणे म्हणजेच 'बोलणे.' तर आपल्या विचारांचे इतरांसमोर ठामपणे, निर्भीडपणे आणि सत्या-असत्याची शहानिशा करून त्याचे प्रकटीकरण करणे म्हणजेच 'वक्तृत्व' आणि हे गुण अंगी असणे म्हणजेच 'वक्तृत्व कला' होय.

अशा प्रकारे प्रत्येकाने आत्मविश्वासाने 'वक्तृत्व कला' जोपासली पाहिजे आणि जीवनात तिचा अवलंब केला पाहिजे.

कु. विनिता प्रशांत पांजरी
११ वी (कला)



'आत्मविश्वास' हे कर्तृत्व वृक्षाचे मूळ आहे.

# बळीराजाचे दुःख.....



जून झाला तरी पाऊस न्हाई।
आभाळात पाण्याचा रिपुस न्हाई
मेघराजा बळीराजाला भेटाया पायजे.....
बळीराजाचे दु:ख समजाया पायजे.....

कोरडी झाली शेते.....पापणी ओलावते
काळी आई पाण्याने ओलीत झाली पायजे
बळीराजाचे दु:ख समजाया पायजे.....

दुबार पेरणी केली पण.......
पाऊस न्हाई आला.....मन दु:खी आहते....
तरी शेत भरुन येईल असं स्वप्न पाहते.....
बळीराजाचे दु:ख समजाया पायजे.....



सावकार म्हणतो,'घर घेणार ताब्यात!!'
बँक म्हणते,'शिवार घेणार ताब्यात!!!'
बळीराजाला मदतीचे हात दिले पायजे
बळीराजाचे दु:ख समजाया पायजे
बळीराजाचे दु:ख समजाया पायजे

- आशिष शेषराव वाकुडे
आठवी (अ)

'निसर्गाचे रक्षण' हीच बळाची खरी सफलता.

# वेळेचे गणित



गमावलेले धन कष्ट करुन परत मिळवता येते. विस्मृतीत गेलेले ज्ञान अभ्यासाने परत प्राप्त होते ढासळलेली प्रकृती उपचारांनी परत ठीक होते. परंतु गेलेली 'वेळ' मात्र परत मिळत नाही. वेळ ही एक अमूल्य गोष्ट. ही दुर्मीळ वस्तू अतिशय हिशोबीपणे, काटकसरीने, विचारपूर्वक वापरायला हवी. इंग्रजीमध्ये एका ठिकाणी म्हटले आहे, 'Time is money. Time & tide wait for none.' वेळ आणि भरती कुणासाठी थांबत नाही. घड्याळ टिक टिक टिक करत सांगत राहते, 'आला क्षण, गेला क्षण!' हा पुढे धावणारा काळ कुणासाठी थांबत नाही. हिंदीत म्हटले आहे, 'क्षण को क्षुद्र मत समझो भाई, क्षण जग का निर्माता है!' प्रत्येक क्षणाला एक वेगळंच महत्त्व आहे. 'क्षण देवो भव!' म्हणत क्षणाची उपासना - आराधना करायला हवी.

जीवनात जे यशवान, कीर्तिमान होतात, ते रिकाम्या वेळेचा विनियोग योग्य रीतीने करतात. वेळेचा आदर ठेवतात. प्रत्येक काम वेळेनुसार हातावेगळे करतात. ज्ञान, पैसा, मानसन्मान कौशल्य या साऱ्यांच्या प्राप्तीसाठी वेळेचा सदुपयोग अत्यावश्यक आहे. 'वेळ नाही' असे रडगाणे आळशी, बेपर्वा, उदासीन माणूस वाजवत असतो. पण विचारी, जिद्दी, काहीतरी वेगळे, अधिक चांगले करु इच्छिणारा माणूस आपल्या वेळेच्या बाबतीत काटेकोर असतो, जागरुक असतो. त्याने रिकाम्या वेळेची विभागणी विचारपूर्वक केलेली असते. त्यानुसार आखणी करुन तो नियमितपणे निश्चित वेळात काम पुरे करण्यासाठी धडपडत असतो. प्रत्येक गोष्ट वेळेवर, वेळेनुसार करण्याची ज्याला सवय जडते तो निश्चिंत असतो.

'गेला क्षण नजरेआड होतो, नवा क्षण नकळत सामोरा येतो'

इकडे तिकडे चकाट्या पिटत बसण्यापेक्षा क्षणाचं मोल जाणून आपण वागायला हवं. वेळेचे गणित ज्याला नीट सोडवता येईल, तो नेहमी प्रगतीपथावरच राहील. रिकाम्या वेळेचा सदुपयोग म्हणून छंद जोपासले पाहिजेत. अवांतर वाचनाचा भरपूर सराव करायला हवा. कलासाधना, कलानंद हे अधिकाधिक प्रमाणात प्राप्त व्हावेत, म्हणून वेळेचा सदुपयोग कसा होईल याचा ध्यास घेतला पाहीजे. आपल्या आवडीच्या उद्योगात रमणे किंवा आपल्या प्रिय व्यक्तींच्या सहवासात घालवायला वेळ मिळणे, याचा आनंद प्रत्येकाला असतो.

निश्चित वेळ न पाळणे ही गोष्ट वचन न पाळण्याइतकीच वाईट समजली जाते.

मोकळ्या वेळेत आपल्याला आपल्या जीवनाचा खरा अर्थ उलगडू शकतो. विविध कलांची वाढने अशा मोकळ्या वेळेतच समृद्ध होतात. अशा कलांमधूनच 'मानवी मन' प्रकट करणाऱ्या संस्कृतीची पायाभरणी होत असते. प्रारंभीच्या कालखंडात कलेची वाढ, अशी माणसाच्या मोकळ्या वेळेच्या सदुपयोगातून झालेली आहे. मोकळ्या वेळेचा असा आपल्या जीवनाशी व जीवनातील कलात्मक संस्कृतीशी जवळचा संबंध आहे.

लेखन, वाचन, संगीत इ. कलांच्या क्षेत्रातील ज्ञान वाढवणे, विविध कलांची प्रदर्शने पाहणे, ऐतिहासिक व निसर्गरम्य स्थळांच्या सहली काढणे, बागकाम अशा अनेक उद्योगांत आपला मोकळा वेळ सार्थकी लावावा. ज्याच्याजवळ धन, वेळ व धाडस आहे त्याने नाटके बसविणे, चित्रपट निर्मिती करणे, स्वतःमधील कलावंत घडविणे या गोष्टींकडे वळता येईल. समाजाचे जे आज अनेक थरांवरचे प्रश्न आहेत, त्या पैकी एखाद्या प्रश्नासाठी यथाशक्ती स्वतःला गुंतवून घेण्याने आपल्या हातून एखादे समाजोपयोगी कार्य घडू शकेल.

'रिकामे मन हा सैतानाचा कारखाना असतो' असे म्हटले जाते. आपल्या शकल्याशागल्या मनाला कधीही रिकामे राहू देऊ नका. आपला वेळ कसा घालवायचा याची योजनाबद्ध आखणी करण्याची सवय रिकाम्या वेळेचा सदुपयोग केल्याने लागते. स्वातंत्र्यवीर सावरकर, लोकमान्य टिळक यांनी तुरुंगातल्या दिवसांचा, वेळेचा सदुपयोग केला. 'उभा जन्म देशसेवेसाठी' असं म्हणत कालक्रमण करणारे देशभक्त, चोवीस तास संशोधनात रमलेले शास्त्रज्ञ, ज्ञानसाधना करणारे 'ज्ञानोपासक' हे सारे अमूल्य वेळ सत्कर्मात घालवतात. सदुपयोग करून आयुष्याचे सोने करतात. 'क्षण देवो भव' हा कानमंत्र तुम्ही-आम्ही जपायला हवा.

क्षणशः कणशश्चैव विद्यामर्थं च साधयेत्

क्षणत्यागे कुतो विद्या कणत्यागे कुतो धनम् ।

क्षणक्षण वेळेचा सदुपयोग केला तरच ज्ञान, विद्या प्राप्त करता येते. कणकण साठवूनच धन प्राप्त होते. एक जरी कण दवडला तरी धन कमी होते आणि एक क्षणही फुकट घालवला तरी विद्या कमी प्राप्त होते. म्हणून विद्यार्थ्यांनी नेहमीच ज्ञानासाठी अधाशी बनावे व वेळेचा सदुपयोग करून आयुष्याचे सोने करावे.

- रोहित गंगाराम कोकरे.

दहावी 'अ'





कु. भावेश शरद केरकर. सातवी, ब

# पत्रलेखन: एक प्रयत्न



प्रिय बाप्पा,

हाय!! what's app बाप्पा, अलीकडे आहेस कुठे ? जगात काही चांगलं घडलं की तुझं अस्तित्व निर्विवाद लोकांना प्रकर्षाने जाणवतं. नाहीतर देव आहेच कुठे? असा प्रश्न नास्तिक लोकांच्या मनात असतो. त्यांना नास्तिक पण म्हणता येणार नाही; कारण हे 'विज्ञानयुग' आहे पण आस्तिक लोक देवाचं अस्तित्व मान्य करतात; तर आपल्यासोबत असलेल्या अद्भूत शक्तीला जे positive waves मानतात, असा प्रवर्ग पण समाजात आहे. असो, पण तुला सगळे प्रश्न सांगितल्यावर तू ते सोडवतोस, असा माझा अनुभव आहे.

तर, पृथ्वीवर सगळं चांगले आहे. नोटबंदीचा निर्णय तुझ्या कानावर आला असेल? योग्य निर्णय आहे का तो देवा? किती लोकांचे बळी गेले, जनजीवन काही दिवसांसाठी विस्कळीत आले; पण हे देशाच्या भल्यासाठीच आहे, असा दावा आहे. काही मिळवायचं असेल तर काहीतरी गमवावं लागतंच ना? गेल्यावर्षीच्या पत्रात मी स्त्रियांवरील अत्याचार, हुंडाबळी, जातीभेद, भोंदुगिरी याचा उल्लेख केला होता. हे प्रकार आता खूप प्रमाणात कमी होत आहेत. मात्र याच विषयांवर तास तास भाषण करणाऱ्यांच्या मेंदूला मात्र कीड लागतेय. तू बुद्धिदाता आहेस; पण ज्या सत्ताधारी लोकांना तू देशसेवेसाठी पाठवलेस, दीनदुबळ्यांचा आधार व्हायला पाठवलेस, त्यांच्या तल्लख बुद्धीवर, जी नको तिथे वापरली जाते, त्यावर आळा घाल आता जरा! याला ही अपवाद आहेत हा देवा, खूप लोक नीतीने काम करत आहेत, त्यांची मात्र भरभराट कर देवा!

आणि सगळ्यांना चांगली बुद्धी दे! जेणेकरून चांगली कामे होतील आणि याची मदत देशसेवेला होईल. तरुणपिढी जी व्यसनाधीन होतेय, इतर वाईट मार्गाला जातेय, त्यांची उर्जा चांगल्या कामाला वापरण्याची बुद्धी त्यांना दे! आणि हो, महत्त्वाचं म्हणजे स्वतःकडे लक्ष दे! काळजी घे! इकडे पृथ्वीवर आजार उत्पन्न आलेत. तुमच्याकडे पण काही असेल तर तुलापण बी.पी., शुगरचा त्रास होईल. काळजी घे!!



तुझीच कृपाभिलाषी,
अ.बा.क.

-भूमिका सुरेश तोंडवळकर
अकरावी - विज्ञान

# मैत्री

मैत्री असावी जाळ्यासारखी
एकमेकांत गुंतवणारी
धडपडताना सावरणारी
संकटात साथ देणारी

मैत्री असावी फुलासारखी
नव्याने उमलत राहणारी
प्रेमाचा सुगंध देणारी
मनातील भावना ओळखणारी

मैत्री असावी झऱ्यासारखी
आपुलकी, माया, जिव्हाळा देणारी
जिवास जीव लावणारी
चुकल्यावर योग्य दिशा दाखवणारी

मैत्री असावी, सूर्यासारखी
आशेचे किरण दाखवणारी
संपता न संपणारी
जन्मभर साथ देणारी......

*श्रुती श्रीकृष्ण जाधव*
*आठवी (अ)*



# पटलं तर घ्या!!

मस्करी नाही करत, खरंच एक गोष्ट सांगते
ऐकून घ्या, नाहीतर सोडून द्या, जे मी सांगते!

माणूस माणसाला विसरला, अभिमानात बुडाला
माणुसकी विसरून, पैशासाठी खून करू लागला

आला ही जातो देवळात, चार आणे टाकतो
परवडलं नाही देवाला तरी भरपूर मागतो

तीर्थप्रसाद घेणारच!.....न सांगता जेवणार...
आरती सुरु होताच, मात्र बाजूने पळणार...

भजनाला थांबायला, 'वेळ नाही' सांगणार
रेकॉर्ड डान्ससाठी, मात्र रात्रभर थांबणार

मस्करी नाही करत खरंच, एक गोष्ट सांगते
पटलं तर घ्या, नाहीतर सोडून द्या......

*रिया विजय जाधव*
*नववी (अ)*





# पर्यावरण आणि मानवी जीवन



आपल्या सूर्यमालेत आठ ग्रहांपैकी असा एकच ग्रह आहे की, ज्या ग्रहावर ही सारी सजीवसृष्टी वसलेली आहे आणि तो ग्रह म्हणजे आपली ही 'पृथ्वी'. या विश्वात पृथ्वी, आप, वायु, तेज व आकाश या पंचमहाभुतांचे वर्णन केलं गेलं आहे. ही पंचमहाभुते म्हणजे दुसरं तिसरं काहीही नसून आपले हे पर्यावरणच आहे. जर सर्वसामान्य माणसाच्या शब्दांत सांगायचं झालंच तर आपली ही पृथ्वी आणि त्यावर असलेली प्रत्येक वस्तू म्हणजे आपलं पर्यावरण होय.

मित्रांनो! तुम्ही महाभारतातील एक कथा ऐकली असालच. पांडव द्युतात द्रौपदीला हरवून बसले असता मदोन्मत्त झालेल्या कौरवांनी तिला भर सभेत ओढत आणले. दु:शासन तिला भर सभेत आणत असतानाच सर्व श्रेष्ठ मामा आजी धरून मूकपणे बसून होते. द्रौपदी कृष्णाच्या धावा करीत होती. तिच्या अंगावरचे वस्त्र संपत नव्हते. तेवढ्यात भीष्माचार्य गरजले कारण या दुष्ट दु:शासनाने चक्क द्रौपदीच्या वस्त्रांनाच हात घातला होता. महाभारतातल्या या कथेची आठवण आपल्याला आजही होतेच आहे. कारण आजही हे वस्त्रहरण चालूच आहे आणि तेही या 'पर्यावरणाचे!'

एके काळी हे पर्यावरण हिरवळीच्या भरजरी वस्त्राने आपले अंग झाकून घेत असे; पण गेल्या काही वर्षांपासून मानवाने चालविलेल्या अमाप वृक्षतोडीवरून असे जाणवले आहे की मानवाने या पर्यावरणाला विवस्त्र बनविण्याचे जणू ठरविलेच आहे. पूर्वी हिरवळीने नटलेले, सजलेले हे पर्यावरण शालू पांघरलेल्या एखाद्या नव्या नवरी प्रमाणे दिसत असे; पण आता असे पर्यावरण एखाद्या वैराण वाळवंटासारखे दिसू लागले आहे. विकासाच्या नावाखाली पर्यावरणामध्ये मानवी हस्तक्षेप वाढल्याने जैवविविधतेचा ऱ्हास, हवामान बदल, जागतिक तापमान वाढ इत्यादी अनेक समस्या मानवापुढे 'आ' वासून उभ्या आहेत.

